| | |
|---|---|
| MHNG030049702026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८८२/२०२६**<br>**सलीम खान मेहमुद खान वि. महाराष्ट्र शासन** |

**<u>निशाणी १ वरील आदेश</u>**

अर्जदार यांनी पारडी पोलिस स्टेशन, नागपूर येथे गु.र.क्र.५२/२०२६, कलम ३०३(२) व ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये नोंद असलेल्या गुन्ह्यामध्ये जप्त केलेला चारचाकी ट्रक वाहन रजि. क्र. MH-31-CB-6050, चेसीस क्र. 416425BTZ105474, इंजीन क्र. 497TC93BTZ106559 चा अंतरीम ताबा मिळण्याकरीता भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३ नुसार अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनानुसार अर्जात नमुद वाहन अर्जदार यांच्या मालकीचे आहे. वर नमूद गुन्ह्याकामी पोलिसांनी सदरचे वाहन जप्त केलेले आहे. सदर वाहनाची गुन्ह्याच्या तपासाकामी आवश्यकता नाही. सदरच्या वाहनाची अर्जदारास आवश्यकता असल्याने त्यांनी सदर वाहनाचा अंतरीम ताबा मिळण्याची विनंती केली आहे. सदर वाहनाचा ताबा मिळाल्यास अर्जदार त्याचे मुळ स्वरुपात कुठलाही बदल करणार नाही व हस्तांतरण करणार नाही असे अर्जदारांनी नमूद केलेले आहे.

३. संबंधित तपासी अधिकारी यांनी निशाणी ०४ प्रमाणे खुलासा दाखल करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. विद्वान सरकारी वकील यांनी खुलासा दाखल करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदार यांनी त्यांचे कथनाच्या पुष्टीकरीता निशाणी ०३ सोबत अर्जात नमुद वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्राची, पी.यु.सी.ची, वाहन विम्याची, वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्राची, वाहन चालविण्याच्या परवान्याची व आधार कार्डची छायांकित प्रत तसेच एफ.आय.आर.ची प्रत इ. दस्त दाखल केलेले आहे.

५. अर्जदार यांनी दाखल केलेल्या वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रा वरुन अर्जात नमूद वाहन हे अर्जदाराचे नावे नोंदणी असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जात नमुद वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याबाबत प्रथम दर्शनी दिसुन येते.

६. अर्जात नमूद वाहन पोलिस स्टेशनला जास्त दिवस पडुन राहील्यास त्यात निश्चितच तांत्रीक बिघाड निर्माण होण्याची शक्यता आहे व तसे झाल्यास अर्जदाराचे नुकसान होईल हे देखील स्पष्ट आहे. <u>सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजराथ राज्य ए.आय.आर. २००३ मा.सर्वोच्च न्यायालय</u>

६३८ या न्यायनिर्णयातील मा.सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वानुसार अशा जप्त मुद्देमालासंबंधी त्वरीत आदेश करणे आवश्यक आहे. संबंधीत तपासी अधिकारी यांनी गुन्ह्याच्या चौकशीकामी वाहनाची आवश्यकता असल्याबाबत काही नमुद केलेले नाही. त्यामुळे अर्जात नमुद वाहन योग्य त्या अटी-शर्तीवर अर्जदारांच्या ताब्यात दिल्यास अभियोग पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. अर्जात दाखल दस्तऐवजांवरुन व खुलाशाचे अवलोकन करता अर्जदार हे अर्जात नमुद वाहनाचा अंतरीम ताबा मिळण्यास पात्र ठरतात. सबब खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमूद गु.र.क्र.५२/२०२६, कलम ३०३(२) व ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये नोंद असलेल्या गुन्ह्यामध्ये जप्त केलेला चारचाकी ट्रक वाहन रजि. क्र. MH-31-CB-6050, चेसीस क्र. 416425BTZ105474, इंजीन क्र. 497TC93BTZ106559 चा अंतरीम ताबा रक्कम रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख मात्र) चे सुपूर्तनामा सादर केल्यानंतर खालील अटी व शर्तीवर इतर गुन्ह्याच्या कामी आवश्यकता नसल्यास अर्जदार **सलीम खान मेहमुद खान** यांना देण्यात यावा.

   अ. जप्त वाहन आहे त्या स्थितीत ठेवण्यात यावे. त्याचे रंगात, आकारात अथवा कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येवु नये व वाहन हे इतर कोणालाही हंस्तातर किंवा विक्री करण्यात येवु नये.

   ब. न्यायालय आदेश करेल त्यावेळी सदर वाहन आदेशित स्थळी हजर करावे.

   क. संबंधीत अर्जदार यांनी सदर वाहनाचे मुळ दस्त ताबा घेतेवेळेस तपासी अधिकारी यांचे अवलोकनाकरीता हजर करावे. तपासी अधिकारी यांनी मूळ दस्तऐवजांचे अवलोकन केल्यानंतरच वर नमुद वाहनाचा अंतरीम ताबा संबंधीत अर्जदारास द्यावा.

३. अर्जदार यांना सदर वाहनाचा ताबा देण्यापुर्वी संबंधित तपासी अधिकारी यांनी जप्त वाहनाचा साक्षीदारांसमक्ष पंचनामा तयार करुन व अर्जदाराच्या खर्चाने वाहनाचे रंगीत छायाचित्रे काढुन दोषारोपपत्रासह न्यायालयात दाखल करावे.

PATIL NILESH BHASKAR

Order
Digitally signed by PATIL NILESH BHASKAR
Location: Nagpur
Date: 2026.03.18 11:14:03 +0530

दिनांकः १२-०३-२०२६.

( निलेश भा. पाटील )
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.३, नागपूर.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. File of order are same word to word as per original order.

Name of Stenographer : Smt.V.N.Meshram